# बापूंच्या वाटेवर, बापूंच्या सोबतीने

*- ॲनेटवीरा वेबर-विन्कलो, जर्मनी*

---

'भक्तीच्या प्रदेशाला सीमा नसतात' असं एका गुरुवारच्या प्रवचनात बापू म्हणाले होते. त्या गुरुवारी 'जर्मन सिस्टर्स'नी म्हणजेच जर्मनीच्या आपल्या श्रद्धावान भगिनींनी, त्यांनी बापूंवर लिहिलेली व संगीतबद्ध केलेली काही जर्मन व इंग्रजी गीते सादर केली. त्यामधला भाव सर्वांच्याच मनाला भावला, भिडला होता. शब्दांच्या भाषेची आवश्यकता, ना बापूंचे प्रेम जाणवण्यासाठी असते ना आपला भाव त्यांच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी! इथे बापूंचे प्रेमच सर्व काम करते. ह्या तत्त्वाचं सुंदर उदाहरण म्हणजे ह्या आपल्या जर्मन सिस्टर्स. हे भक्तीचं 'कनेक्शन' बापू जोडतात.

गेली १२ वर्षे ह्या भगिनी बापू-परिवारात समरसून गेल्या आहेत.

त्यांच्या प्रत्येक कृतीत, वागण्यात बापू आणि फक्त बापूचे प्रेमच प्रतीत होते. हे एवढे सगळे करूनही - 'आम्ही अधिक काय करू शकतो' असेच त्यांचे विचारणे असते.

हा आपलेपणा, हे नातं कसं जोडलं गेलं? जो इथे यायचा आहे, त्याला बापू बरोब्बर आणतातच. पण इतक्या दूरच्या देशातल्या, वेगळ्या संस्कृतीतल्या ह्या आपल्या भगिनी बापूभक्तीत कशा भिजून गेल्या आहेत ते त्यांच्या कथनातून जाणवेलच. हे प्रांजल आणि गोड कथन वाचल्यावर प्रत्येकाला आपापल्या अंत:करणात जो भाव प्रतिबिंबित झालेला जाणवेल, तो शब्दातीत असेल. तरीही ओळखीचा....कारण हा बापूप्रेमाचा भाव आहे, ही बापूंच्या आपल्यावरच्या प्रेमाची आपल्याला ओळखीची असलेली जाणीव आहे. सर्व काही बापूंपासून सुरू होतं आणि बापूंच्याच दिशेने प्रवास करतं. म्हणूनच भक्तीच्या प्रदेशाला सीमा नाहीत ! म्हणूनच इथे सगळेच आपले आहेत....ओळखीचे.

---

बापूंच्या कृपाशीर्वादाने अनुभव पुष्कळ आले पण मागे वळून पाहिलं तर लक्षात येतं की माझं आयुष्यच संपूर्णपणे बदलून गेलंय, आयुष्याचा दृष्टिकोन बदललाय. तेव्हा मला बोलायचं आहे, ते फक्त एखाद्या विशिष्ट अनुभवाबद्दल नाही, तर मला आयुष्यातल्या ह्या बदलाबद्दल, आयुष्यात आलेल्या आनंदाबद्दल बोलायचंय.

२००० साली भारतात येण्याची माझी पहिलीच वेळ होती.

एका मैत्रिणीने आम्हाला बापूंबद्दल माहिती सांगितली होती. आम्ही एक ग्रुप म्हणून एका सात दिवसाच्या 'पूजन-उत्सवा'मध्ये भाग घेण्यासाठी भारतात येण्यास निघालो. तो उत्सव होता व्यंकटेशपूजनाचा. आमच्यापैकी एकालाही भारतीय संस्कृती, परंपरा ह्यांची काहीही कल्पना नव्हती आणि सद्‌गुरु म्हणजे काय ते तर दूरच राहिलं, 'सद्‌गुरु' हा शब्दही माहीत असण्याचा प्रश्न नव्हता. पण एवढं मात्र खरं, एक ओढ लागून राहिली होती, काहीतरी आम्हाला आकर्षित करत होतं. ते काय होतं, कोण होतं, काही कळत नव्हतं. सगळं नवीन होतं, खास होतं.

ह्या माझ्या पहिल्या भेटीतच, बापू-नंदाई-सुचितदादांना अगदी पहिल्यांदा पाहिल्यावरच जाणवलं की संस्कृती, वातावरण सगळं अनोळखी असूनही मी 'आपल्या' माणसांच्यात होते, माझा आंतरिक शोध इथेच थांबला होता, माझी माझ्याच दिशेने नेणारी वाट इथेच येऊन थांबली होती. मला आत कुठेतरी निश्चित माहीत होतं की मला आधार मिळणार आहे, तो इथेच; मला मदत, प्रेम मिळणार आहे, ते इथेच. मी घरी आले होते, आपल्या घरी ! मला काहीतरी गवसलं होतं. ज्याच्या सान्निध्यात प्रेम, फक्त प्रेम इतक्या सहजतेने आणि स्पष्टपणे, प्रकर्षाने जाणवतं अशी बापूंसारखी व्यक्ती मला त्याआधी कधीही भेटली नव्हती. मी जर्मनीला परतले ते बापूंचा फोटो घेऊन. माझ्या बापूंच्या सोबतीने घडणाऱ्या प्रवासाची सुरुवात झाली होती.

ह्या प्रवासादरम्यान अनेक प्रश्न उभे राहतही - मी काय करते आहे इथे ?...ते मला फारसं काही समजत नव्हतं ! सद्‌गुरु म्हणजे काय? मंत्र म्हणजे काय आणि ते कसा परिणाम करतात? माझ्या घरची, आसपासची मंडळी चिंतेत असत....आमचा इतिहास ह्या अशा विचारसरणीला बराचसा जबाबदार आहे. अगदी स्वस्तिक हे चिन्ह पाहूनच मी बेचैन होत असे.

माझं हेच मन एक ग्वाही मात्र निश्चितपणे व सातत्याने देत होतं - बापू कशाहीपेक्षा खूप मोठे आहेत, कोणत्याही प्रश्नापेक्षा, शंकेपेक्षा आणि कुणाच्याही विरोधापेक्षा मोठे आहेत. मी आजवर जे इतिहासात शिकले त्यापेक्षाही मोठे आहेत. शिवाय जेव्हा जेव्हा मी बापूंच्या फोटोकडे पाहत असे, तेव्हा तेव्हा मला खूप प्रेम जाणवत असे, 'प्रोटेक्टेड' वाटत असे. मी ह्या भावनेशी व बापूंशी घट्ट बांधले गेले होते. माझं ठाम मत होतं, आपण कोणीही असू, आपण बापूंचे हे प्रेम अनुभवू शकतो, आपण आपला स्वत:चा असा अनुभव, नातं बापूंशी जोडू शकतो, आपल्याला ते बोलत असलेली भाषा येवो न येवो, आपण भारतीय असू की जर्मन, कोणत्याही संस्कृतीच्या संस्कारामध्ये वाढलेले असू, आपण त्यांना दर गुरुवारी पाहत असू की वर्षातून एकदाच....ही कुठलीच गोष्ट आड येऊ शकत नव्हती. प्रत्येकाची बापूंकडे येणारी वाट वेगळी असते. ही वाट आपल्या अंत:करणातूनच निघते आणि ह्या वाटेवर असतात दोघंच - आपण स्वत: आणि बापू. आज बारा वर्षांनी मला मागे वळून पाहताना कळतंय, माझं आयुष्य किती बदललंय ते.

'त्या'आधी मी चाललेली वाट:

२००० सालापर्यंत परमेश्वराजवळ कसं जावं, ह्याचा शोध मी घेतला होता. पण माझ्या प्रश्नांना मला माझ्या संस्कृतीत, परंपरेत, मी वाढले त्या वातावरणात उत्तरं न मिळाल्यामुळे मी अन्य काही प्राचीन संस्कृतींचा मार्ग धरलाही होता - उदा. केल्टिश. मला त्यातील काही निसर्गाशी नातं जोडणाऱ्या प्रथा, विधी भावल्याही; पण मी तरीही ह्या सर्वांशी एकरूप होऊ शकले

नाही, मी 'किनाऱ्यावरच' राहिले, मला काहीसं एकटं वाटे.

आणि मला ह्या भारताला भेट देण्याच्या संधीचा अनेक कारणांनी लाभ घ्यावासा वाटला; ह्या देशाशी व येथील संस्कृतीशी अगदी कधीही काहीच संबंध आला नव्हता तरीही.

बापूंना सर्वप्रथम बघितल्यावर वाटलं ते असं: हा जो समोर दिसतोय, तो संपूर्णपणे 'मानवी' आहे....हा मला दिसू शकतो, मी ह्याचा आवाज ऐकू शकते; ह्याच्या डोळ्यातून सतत प्रेमच वाहत असतं - मी कुठल्याही मानवाच्या बाबतीत कधीही न अनुभवलेली ही गोष्ट असली तरीही हा संपूर्णपणे 'नॉर्मल', तुमच्यामाझ्यासारखा वाटतो ! कसल्याही मोठ्या गप्पा नाहीत; सगळं खरं, मनापासून, सुस्पष्ट आणि नि:संदिग्ध असं ! माझ्यासमोर तर हा आपल्या पत्नी आणि मुलांसमवेत बसला आहे. सर्वसामान्यांसारख्या वेशात बसला आहे. हा उच्चशिक्षित डॉक्टर असून सेवा, कारुण्य, भक्ती ह्याबद्दल फक्त बोलत नाही, तो स्वत: ह्या सर्वाचं एक उत्तम उदाहरण आहे. कोणतेही जादूचे प्रयोग नाहीत, हातचलाखीचे खेळ नाहीत. इथे आहे फक्त प्रेम, आनंद आणि आनंदी, मोकळी माणसं. हे माझं पहिलं आणि ठाम इम्प्रेशन होतं.

नंदाईने आम्हाला उद्देशून बोललेले पहिले शब्द होते, ''इथे तुम्हाला अनुभवायला मिळेल, ते शुद्ध प्रेम, अगदी भरपूर, अनंत !''

तर अशा तऱ्हेने मला माझ्या शोधाच्या वाटेवर भेटला एक जिवलग मित्र ! एक असा मित्र ज्याने मला हाताला धरून चालवण्याचे, मार्गदर्शन करण्याचे, माझे संरक्षण करण्याचे, दिवसरात्र माझा पाठीराखा बनण्याचे, मला कधीही न टाकण्याचे आणि मला आईचे आणि वडिलांचे प्रेम देण्याचे वचन पहिल्याच भेटीत दिले; आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे हे सर्व माझा हा मित्र मी माझे रोजचे कौटुंबिक जीवन जगत असतानाच करणार होता ! ह्या वचनाबद्दल मी काय बोलावं ! पूर्ण कौटुंबिक, गृहस्थजीवनात राहून मी जबाबदाऱ्या-कर्तव्ये पार पाडत असताना हा माझा मित्र माझ्या सर्व अध्यात्मिक प्रगतीचीही जबाबदारी घेणार होता ! हे माझ्या तोपर्यंतच्या 'आध्यात्मिक' कल्पनांना पूर्ण छेद देणारं होतं ! ही प्रक्रिया अतिशय खोलवर घडत होती पण तरीही सामान्य जीवनात, बाह्य जीवनात प्रतीत होत होती.

२००० सालची गोष्ट. आमची मुलं अनुक्रमे १२ व ७ अशा वयाची होती. आम्ही बर्लिनच्या ज्या भागात रहात होतो, तिथे ड्रग्जचे सेवन व हिंसक प्रकार ह्यांचे प्राबल्य होते. मुलं शाळेत गेली किंवा कुठे बाहेर पडली की मला नेहमी काळजी वाटत असे.

....आणि सद्गुरुंच्या कृपेचे छत्र, माझ्या ह्या मित्राचे संरक्षण म्हणजे काय ते आयुष्यात प्रथम जाणवलं, तेही अगदी स्पष्टपणे !

मी माझ्या मुलांसाठी, माझ्या कुटुंबासाठी प्रार्थना करत असते, त्यांचे रक्षण व्हावे अशी प्रेमळ विनंती करत असते आणि जाणवतं की आमच्यासाठी हा मित्र सदैव, अगदी कोणत्याही वेळेला, प्रत्येक क्षणाला तत्पर असतो. तो फक्त माझंच नाही तर माझ्या सगळ्या आप्तांचं, जवळच्यांचंही रक्षण करतच असतो. एक कुटुंब म्हणून आमची इतकी इच्छा होती की दुसऱ्या एखाद्या भागात घर असावं आणि बापूंच्या कृपेने आम्हाला इतकं सुंदर रो-हाऊस मिळालं सुद्धा ! शेजारीही खूप चांगले होते आणि आमच्या मुलांच्याच वयाची मुलंही आसपास होती ! बापूंच्या दिशेने नेणारी वाट आपण बापूंबरोबरच चालतो आणि त्यांच्याच कृपेने वाटेतले अडसर सहज दूर होत असतात. ह्या आमच्या घराच्या बाबतीतही तेच घडलं - आम्हाला सुरुवातीला कठीण वाटणाऱ्या, महाग वाटणाऱ्या घरासाठी आम्ही पैशाची व्यवस्था करू शकलो. हे केवळ बापूंमुळेच, त्यांच्या आशीर्वादामुळेच शक्य झाले.

ह्या घरात आलो आणि आमची धाकटी मुलगी खूप आजारी झाली. आम्हाला काहीच सुचत नव्हतं. इतकं लहान वय आणि मोठा आजार....

पण इथेही बापूंनीच तारलं. इथेही बापूंचं प्रेम आणि संरक्षण जाणवलं. बापूंनी संपूर्ण कुटुंबालाच ह्या चिंतेतून मोकळं केलं. तसं पाहिलं तर २००५ सालापर्यंत आम्हाला ह्या तिच्या आजाराशी झगडावं लागत होतं. कधी भय जाणवायचं; तर कधी धीर आणि ताकद आपोआप निर्माण व्हायची. कधी आम्ही कुटुंबीय पूर्ण हतबल झालेलो असायचो; तर कधी स्वत:लाच नव्याने उठून उभं रहाण्यास भाग पाडत असू. एकमेकांना धरून ठेवून ह्या चढउताराचा सामना केला, पण केवळ बापूंच्या ह्या मंत्राने दिलेल्या ताकदीमुळेच - ''ॐ मन:सामर्थ्यदाता श्रीअनिरुद्धाय नम:'' अगदी कठीण परिस्थितीतही ह्या मंत्राने आम्हाला त्वरित आश्वासक परिणाम दाखवून दिले, आम्ही ते अनुभवले. आमच्या मुलीला होणारा शारीरिक त्रासही लगेचच कमी होत असे व ती शांत होत असे.

आमची मुलगी ९ वर्षाची असताना तिने बापूंची कृपा व प्रेम एका अतिशय सुंदर घटनेमध्ये अनुभवलं. हा क्षण तिने मनात अतिशय खोलवर जपून ठेवला आहे व ती तो तसाच जपून ठेवेल.

तिच्या आजारादरम्यान कधीकधी ती थकून जाई. काही काळ अर्धवट गुंगीत किंवा झोपेत जाई. अशाच एका क्षणी ती बापूंसमोर उभी असल्याचं तिने पाहिलं. ती आपल्या आजाराबद्दल त्यांच्याशी बोलू लागली. तेही तिच्याशी खूप प्रेमाने बोलले. त्यांनी तिला धीर दिला आणि तीन वस्तू भेट दिल्या....पहिली वस्तू होती, स्वास्थ्याचं प्रतीक असलेलं एक फूल. हे सर्वात आधी तिला स्वत:ला मिळालं, मग तिच्या मित्र-मैत्रिणींना, शेजाऱ्यांना, कुटुंबातील इतरांना व त्यानंतर सर्वांना - जे जे म्हणून बापूंकडे आले, त्या सर्वांना.

दुसरी वस्तू होती, एक पेय. तेही आधी तिला, मग तिच्या मित्र-मैत्रिणींना, कुटुंबीयांना आणि बापूंकडे आलेल्या प्रत्येकाला.

त्यानंतर बापूंनी तिला 'ब्रेड' दिला. पुन्हा तिचे सर्व मित्र त्यांच्याकडे आले. त्यांनाही ब्रेड देण्यात आला. कुटुंबीय आले, त्यांनाही मिळाला आणि सर्व जग मग हा ब्रेड खाऊन तृप्त झाले.

मग बापू तिला म्हणाले, ''माझ्या ह्या राइटिंग-टेबलजवळ एक भली मोठी कचऱ्याची टोपली आहे. त्यात तू सगळी तुझी भीती, तुझ्या चिंता टाकून दे.''

त्यानंतर माझ्या मुलीच्या मनात निखळ आनंद ही एकच भावना भरून राहिली होती, सगळं जगच आनंदमय झालं होतं. काळजी, दु:ख, चिंता उरल्याच होत्या कुठे जगात !

तिला जाग आली, तेव्हा तिला खूपच ताजंतवानं वाटत होतं. अगदी तरतरीत आणि फ्रेश. ती मला म्हणाली, ''मला भारतात जाण्याची आवश्यकता नाही. मी आत्ता तिथेच तर होते! मी होते आणि बापूही होते. त्यांनी मला खूप धीर दिला आणि मदतही केली.'' त्यानंतरच्या तीन वर्षांमध्ये तिचा आजार कमी कमी होत गेला आणि आज ती पूर्णपणे स्वस्थ आहे, ह्या आजारातून पूर्णपणे बरी झाली आहे. अगदी ठणठणीत बरी !

माझी मुलं माझ्या बापूंच्या छत्रछायेत, प्रेमकृपेमध्ये आहेत ही जाणीव, ही खात्री असणं ह्यापेक्षा मोठी भेट, आश्वासन माझ्यासाठी काय असणार ?

बापू माझ्या मुलांच्या पाठीशी सदैव असतात ह्याचा प्रत्यक्ष अनुभव आम्हाला अनेकदा आला आहे. एकदा अशीच रात्रीची वेळ होती. काही तरुण मुलांनी माझ्या मुलाला अनपेक्षितपणे रस्त्यात घेरलं. त्यांच्यापैकी एकाकडे चाकू होता. त्यांनी माझ्या मुलाला धमकावलं. पण अचानक काय झालं कुणास ठाऊक, ही मुलं एकदम वळून पळू लागली. काहीही मारामारी नाही, की काही नाही. माझ्या मुलाकडून कोणताही प्रतिकार नाही, काहीच घडलं नाही. सगळं इतकं वेगाने घडलं की मुलाला बापूंचा मंत्र उच्चारण्याइतका किंवा त्यांना हाक मारण्याइतका काय, त्याला तर त्यांचा विचारही करण्याचा वेळ मिळाला नाही. बापूंनी मात्र त्यांचं प्रेम जाणवून दिलं होतं, त्यांचं सुरक्षा कवच उभारलं होतं, तेही काही घडण्याअगोदरच; आणि हे असं प्रेम विशेषत: गेल्या १२ वर्षांत आम्ही एकदा-दोनदा नाही अनेकदा अनुभवलंय. आमचं कुटुंब अगदी सदैव सुखरूप आणि सुरक्षित असतं. सर्वात मोठं वरदान आहे हे ! खरं सांगायचं तर फक्त माझा नवरा-मुलं-मी असं कुटुंब नव्हे, तर माझे आई-वडील, माझी भावंडं आणि त्यांची कुटुंबेसुद्धा तशीच आणि तितकीच सुरक्षित असतात. ह्या जाणिवेने अर्थातच मला खूप समाधान आणि सुख मिळतं.

बापूंचा महिमा कळल्यानंतर, आम्ही दर वर्षी एका ग्रुपमध्ये, कधी एकदा तर कधी दोन वेळा मुंबईला येऊ लागलो. त्यावेळी आम्ही काही कुटुंबांसमवेत, आमच्या भारतीय मित्रमंडळींसमवेत रहायचो. त्यावेळी आम्ही बापूंबद्दल बरंच काही जाणलं; संस्थेची, कार्याची माहिती आम्हाला मिळाली. आमची प्रत्येक ट्रिप भारतीय पारंपारिक प्रथा, पूजन, संस्कृतीच्या अधिक जवळ नेणारी ठरत असे. आम्ही बहुतांश वेळा उत्सव किंवा खास कार्यक्रमांची वेळ साधूनच येतो. प्रत्येक ट्रिप खास असते. अशी हजारो लाखोंच्या संख्येने जमलेली गर्दी म्हणजे आम्ही युरोपियनांनी कधीही न अनुभवलेली गोष्ट ! इतके लोक एके ठिकाणी फक्त एकाच कारणाने, एकाच इच्छेने एकत्र येतात. फक्त एका बापूंच्या प्रेमापोटी, फक्त त्यांना पहायला ! वृद्ध, आजारी माणसं, हातात तान्ही बाळं घेतलेल्या माता, लहान मुलं, श्रीमंत-गरीब, निराधार, शासकीय अधिकारी, डॉक्टर, अंध, वेगवेगळ्या संस्कृतीतली माणसं, सगळ्या तऱ्हेचे आणि सगळ्या स्तरातले लोक....बापूंकडे येण्याची वाट सर्वांसाठी खुली आहे, मोकळी आहे. त्यांच्याकडे प्रत्येकाला जागा आहे. प्रत्येकाचं इथे स्वागत आहे.

इतक्या वर्षांमध्ये बापूंकडे येणारे युरोपीयन म्हणाल तर आम्हीच असू. आमच्यासाठी इथे बरंच काही नवखं आहे - नवी भाषा, जेवण-खाण, हवामान. इथे बरंच काही आम्हाला समजतही नाही. संस्थेच्या मोठ्या उत्सवांमध्ये शांतपणे बसून भाषांतरासाठी वेळ मिळतोच असं नाही. पण बापूंचं प्रेम आणि आपलेपणा ह्यांना काही सीमा नसतातच, नाही का ? ते ह्या सर्वांपलीकडून आमच्यापर्यंत पोहोचतंच आणि आमच्यातल्या प्रत्येकाचे विचार, भावना, चिंता आणि गरजा त्यांच्यापर्यंत पोहोचतातच. हाच सर्वात मोठा अनुभव असतो.

अशीच एक हृद्य घटना आठवली, ती इथे सांगावीशी वाटते.

अशाच एका उत्सवाला आम्ही तुडुंब गर्दीमधून अक्षरश: तरंगत पुढे ओढले जात होतो. सारी गर्दी खूप जोशात ओरडत होती. खूप धक्काबुक्की होत होती. सगळे ओरडत होते. मला त्यातलं एक अक्षरही कळत नव्हतं. सगळ्यांच्या मुठी आकाशाच्या दिशेने उंचावल्या जात होत्या. मला तेव्हा ते लढवय्यांना स्फूर्तीदायक असे उद्गार वाटले. असं काही मला आवडत नाही, अगदी कुठेही घडत असलं तरी ! त्यावेळी मला 'हे कुठे आलो आहोत आपण' असं वाटलं ! मला असा ओरडा, गलका आवडत नाही. मला ह्याची अजिबात सवय नाही. पण हे नेमकं काय चाललंय ते मला कळायलाच हवं, असं मी स्वत:शी म्हटलं.

आवाज आता अधिकच मोठा होत होता. बापू जवळ आले होते. माझ्यात मला प्रतिकार जाणवला आणि मनात विचार आला, 'बापू, हे असं मी खरंच नाही करू शकणार. माझ्या विश्वात हे असं घडत नाही कधी. हे मी करू शकत नाही आणि हे मी करणारही नाही.' माझ्यापुरता विचार सुस्पष्ट व निश्चित होता.

पण बापूंना पाहिल्याचा आनंद त्यापेक्षा निश्चितच खूपच अधिक होता, त्यामध्ये ह्या न आवडणाऱ्या गोष्टी मागे पडल्या. पण त्यावेळी मी माझी मूठ उंचावली नाही. त्याऐवजी मी बापूंकडे पाहून हात हलवला. दुतर्फा गर्दीतील गँगवेमधून बापू चालत येत होते. माझ्यापासून अवघ्या पाच मीटर अंतरावर बापू आले आणि तिथे उभे राहिले. ते थेट माझ्याकडे बघून हसत होते, निरतिशय प्रेमाने. माझ्याकडे स्थिर दृष्टीने, पण अपरंपार मायेने ते पहात होते. डोळे मिचकावून त्यांनी आपली स्वत:ची

मूठ आकाशाच्या दिशेने उंचावली....जणू काही ते मला सांगत होते, 'माझ्यावर विश्वास ठेव. जे उचित आहे तेच घडतंय. इथे सर्व नेहमीच उचित, शुभच घडतं.' त्यानंतर ते पुढे चालत गेले. मी मात्र तिथेच उभी राहिले खिळून ! हा क्षण माझ्या अंत:करणाला भिडला होता. मला पूर्णपणे हेलावून टाकलं होतं ह्या बापूंच्या कृतीने. मग कुणीतरी मला, हे जे 'लढवय्यांना स्फूर्तीदायक' ओरडणे वाटले होते, त्याचे भाषांतर करून दिले. ते शब्द होते, ''अनन्यप्रेमस्वरूप, दत्तभक्तचूडामणि, चरणाश्रितत्रितापहर....!'' ती ललकारी असते हे मला त्यावेळी उमगले.

मात्र मला सतत एक सल लागून राहिलेली असते. मन खट्टू होतं. बापू बहुतेक मराठीत बोलतात. कधीतरी हिंदीतसुद्धा बोलतात. काहीवेळा इंग्लिशमध्ये बोलतात. मला काही विधींची पार्श्वभूमी समजत नाही, फारसं काहीच मला माहीत नसतं. प्रत्येक गोष्ट समजून घेणं, बुद्धीचा कस लावून पडताळून पहाणं हा माझा स्वभावच आहे. पण ह्या बाबतीतसुद्धा बापूंनी मला अनेक प्रकारे मदत केली आहे.

बापूंनी मला माझ्या स्वत:च्या परंपरेकडे वळवलं, तिची नव्याने ओळख करून दिली. मला अचानकपणे ख्रिस्ती संस्कृतीत रस वाटू लागला ! माझ्या मुलांनादेखील हे सवयीचं, आपलं असं वाटत होतं आणि माझ्याबरोबर तीही 'कन्फर्मेशन क्लासिस'ला येऊ लागली. आमच्या देशामध्ये परमेश्वराच्या जवळ जाण्यासाठी त्यांच्या वयाची इतर मुलं जे करतात, ते त्यांना करायचं होतं. त्यांनी ते केलं. मी समजू शकत होते. बापू मात्र त्यांच्या हृदयात खूप महत्त्वाच्या स्थानी होते, मार्गदर्शक प्रकाश होते.

येशुख्रिस्तावर मी वाचन आणि अभ्यास सुरू केला. बायबलच्या चर्चा ऐकल्या आणि अंती लक्षात आलं – बापूंचा शब्दच वाचत होते मी ! तिथेही बापूंचाच शब्द ऐकत होते. बायबल काही वेगळं नव्हतं. 'ते' चरणही बापूंचेच चरण होते. हो ! – द फीट ऑफ द सन ('त्याच्या'पुत्राचे चरण), सर्वोच्च तारकाचे, उद्धारकाचे चरण.

हा क्षण, ही जाणीव माझ्या हृदयात खूप खोलवर रुजली, कोरली गेली. एकदा उपासना करताना मला हे स्पष्टपणे आणि ठामपणे उमगलं.

आणि मग इथे जर्मनीमध्ये मी आमच्या चर्चशी संलग्न स्थानिक सेवा उपक्रमांमध्ये भाग घेऊ लागले. आत कुठेतरी मला खूप आनंद वाटत असे. मी योग्य ते करतेय अशी खूण पटली....बापू सर्व ठायी आहेतच. त्यांचं अस्तित्व सर्वत्र जाणवतंच.

हा प्रश्न होता माझ्या हृदयाचा आणि अनिरुद्धांच्या सोबतीने प्रवास करण्याचा....माझ्या हृदयातून निघणाऱ्या त्यांच्या वाटेवर....माझ्यासाठी ही आंतरिक जाणीव, हे उमगणं खूपच अर्थपूर्ण आणि महत्त्वाचं होतं. कुणी म्हणेल ह्या दोन वेगवेगळ्या वाटा एकत्र कशा होतील ? ह्यापैकी कुठलीतरी एकच निवडावी लागेल. पण असं नाही. माझ्यासाठी ह्या वाटांना वेगळं ठरवणारी सीमा अस्तित्वातच नाही. बापू सर्व वेगळ्या वाटांना एकत्र आणतात आणि त्यांच्यातील संस्कृती, त्यांच्यातील धारणा जोडतात आणि माझ्यात ही प्रक्रिया बापूंनी सहज, अगदी नैसर्गिकपणे घडवून आणली आहे. मला 'वेगळं' वाटायला लावणारी कोणतीही सीमा जाणवतच नाही. मला हे खूप भावलं आहे. माझी मातृभूमी, तिची संस्कृती, परंपरा ह्यापासून मी कधीही दूर गेले नाही किंबहुना मी त्यांच्याकडे प्रेमाने वळले. मला कोणतेही बाह्य परिवर्तन करावे लागले नाही की माझं असं काही सोडून द्यावं लागलं नाही की मी माझं घर–कुटुंब–जबाबदाऱ्या–नोकरी सगळं सोडून भारतात येऊन बसले नाही. त्याची काहीही आवश्यकताच नाही. पण मी आवडीने व प्रेमाने भारतीय संस्कृतीचाही अभ्यास करते कारण माझे सद्‌गुरु भारतात आहेत. श्रीराम, श्रीकृष्ण, दत्तगुरु, चण्डिकामाता सर्वांबद्दल वाचते. मनात खूण पटते– हे 'माझं' आहे, 'आपलं' आहे. पण तरीही मी ज्या मूल्यांबरोबर, शिकवणीबरोबर वाढले, तेही सगळं तसंच आहे. मी त्यांच्यापासून अजिबात दूर गेले नाहीये. माझ्यासाठी ही 'हे किंवा ते' अशी परिस्थिती नाहीच आहे. इथे सगळं एक आहे. 'तो' एकच आहे. मी तर असं म्हणेन की बापूंनी मला येशू ख्रिस्तच नीट समजावला; आणि तरीही माझ्या भाषेत मी जे काही त्याच्याबद्दल वाचते, ते बापूंचेच तर शब्द आहेत ! मी जे वाचते ते मला बापूंच्यामुळेच समजू लागलं. ह्यामुळेच माझ्यातला एक खूप मोठा संघर्ष शमला आहे. हे घडलं आणि बापूंचा ग्रंथराज जर्मनमध्ये भाषांतरित करायला सांगण्यात आलं! वेळ खूप लागत असला तरी मी ह्या कामात खूप रमते.

अध्यात्म मी रोजच्या व्यवहारात, सामान्य जीवनात अनुभवते! कौटुंबिक जीवनामध्ये, माझ्या व्यवसायामध्ये (मी आर्टिस्ट आहे व शिक्षिकाही आहे), आमच्या देशातल्या सेवा उपक्रमांमध्ये आणि आमच्या चर्चमध्येही मी हे अनुभवते.

माझं जीवन हेच मुळी बापूंच्या चरणी सेवा ठरावी अशी माझी इच्छा आहे !

कसं शक्य होईल हे ? बापूंनी सांगितल्याप्रमाणे रोज साधारण अर्धा तास उपासना करण्याचे मी मनापासून प्रयास करते. मंत्र संस्कृतमध्ये असतात, पण मी म्हणते. मला आमच्या जर्मनमधल्या काही प्रार्थनाही म्हणायला खूप आवडतात. बापू आपल्या हृदयात रहातात आणि सगळ्यांच्या हृदयातली भाषा त्यांना समजते असा माझा विश्वास आहे.

ह्या रोजच्या जपामुळे व पवित्र ग्रंथराजाच्या पठणामुळे तसंच नेमाने केलेल्या बापूंच्या स्मरणामुळे मला माझी क्षमता वाढण्यास, सुधारण्यास मदत होते; विवेकबुद्धी तीक्ष्ण व जागृत करण्यास मदत होते; काही वागण्या–बोलण्यातल्या प्रवृत्ती बदलण्यास व आधी त्या ओळखण्यास मदत होते आणि माझं लक्ष केंद्रित करून काम करण्याची क्षमताही वाढवण्यास मदत होते. शिवाय बापूंवरच्या विश्वासामुळे, भक्तीमुळे आता 'स्वयं' हे माझं केंद्र राहिलं नाही. हळूहळू, अगदी अलगदपणे जे निघून

जायला हवं ते काढून टाकण्यास बापू मदत करतात; जे तसंच रहायला हवं, ते राखतात आणि जे वाढायला हवं, त्याला पोषण पुरवतात. परंतु 'कर्मस्वातंत्र्य प्रत्येकाला आहे' हा नियम लक्षात ठेवायचा! भक्ती व सेवा ही शिकवण आमच्या संस्कृतीनेही आम्हाला दिली आहे. अहंकाराची वृद्धी हितकारक नाही, सर्वांवर प्रेम करावे, सेवा परमेश्वराला भावते....सर्व काही. परंतु सद्‌गुरुंच्या वाटेवर प्रवास करताना अशी एक वेळ येते, जेव्हा आपण ठरवतो की ही अशी मूल्ये किंवा शिकवण, अगदी त्यातून उद्‌भवणाऱ्या मानसिकता मला कुठल्याही एका संस्कृतीशी जुळवत नाही बसायच्या; मला फक्त बापूंवर ठाम विश्वास ठेवायचा आहे, बापूंची भक्ती करायची आहे, सबुरी शिकायची आहे. बस! त्याचीच गरज आहे.

असा हा माझा जिवलग मित्र सतत माझ्याबरोबर असतो, ज्याला मला केवळ सगळं सुंदर आणि बेस्ट मिळावं अशीच इच्छा असते. तो मला कधीही टाकणार नाही, मग काहीही होवो, अगदी काहीही, तो माझी काळजी घेतोच असा विश्वास असणं, हीच गरज आहे आणि ह्या अशा ठाम विश्वासाची वाट म्हणजेच रोजच्या सामान्य अशा जीवनात मोठे अनुभवाचे क्षण गुंफण्याची वाट; आणि हीच विश्वास अधिकाधिक वाढवणारी वाट असं मला वाटतं!

प्रामाणिकपणे सांगायचं झालं तर माझ्याही मनाला वायफळ विचार, कुतर्क ग्रासतात. पण अशा वेळीही मी बापूंकडेच वळते. तेच ह्यातून बाहेर काढतात कारण मला स्मरतो, तो त्यांनी वेळोवेळी माझ्या आयुष्यात केलेला प्रेमळ हस्तक्षेप, वेळोवेळी उठलेली मनातली खळबळ, शांत करणारे बापूंचे प्रेमळ शब्द आणि वेळोवेळी त्यांनी प्रेमापोटी दूर केलेले अडसर. त्यांनी अनेकदा अमुक एक निर्णय घेण्यास मला दिलेली सद्‌बुद्धी...सगळं काही स्मरतं आणि शांत वाटतं. ह्याच छोट्या छोट्या क्षणांनी माझं जीवन इतकं समृद्ध, सुरक्षित, आनंदी आणि सोपं केलंय की काय सांगू ! हेही बदल बापूंनीच घडवून आणले आहेत.

मला इथे आमच्या जर्मनीमधल्या उपासना ग्रुपचा विशेष उल्लेख करायचा आहे. तोही माझा आधारच आहे. आम्ही नियमितपणे दर शनिवारी भेटतो आणि जगभरातील बापूभक्त आपापल्या केंद्रांवर जी उपासना करतात ती आम्हीही आमच्या केंद्रावर करतो. आम्ही गजर घेतो, गाणी म्हणतो आणि पाळीपाळीने आमचे सद्‌गुरुकृपेचे अनुभव कथन करतो.

बापू नेहमी म्हणतात, उपासना ग्रुप हे वर्कशॉपच आहे! आणि हे अगदी खरं आहे!

ज्या प्रक्रिया आपण एकटे करण्याचा प्रयत्न करतो, त्या सर्व इथे अधिक सुलभतेने घडतात. मुख्य म्हणजे उपक्रम सामूहिक असल्यामुळे, उपासनाही सांघिकच घडत असल्यामुळे व बापू हा कॉमन बंध असल्यामुळे सर्वच एक 'टीम' म्हणून विचार करायला शिकतात. इथे कोणा एकाचा इंटरेस्ट महत्त्वाचा नसतो. फोकस 'बापू' हाच असतो. सरसकट सर्वांच्या हिताचा विचार करण्याची सवय लागते. सोपं नसतं, पण प्रत्येक अडल्या वेळेला बापूच मार्ग दाखवतात. ह्या वर्कशॉपमध्ये आपल्यामध्ये बदल होतो, पण सहज, अलगद. हे सर्व बापूंच्या 'सत्य, प्रेम, आनंद' व 'पावित्र्य हेच प्रमाण' ह्या मर्यादा पाळूनच होत असतं. भारतातील मंडळींशीही आम्ही संपर्कात असतो.

आम्हाला उपासना केंद्र म्हणून अगदी पहिल्यांदा बापूंच्या पादुका मिळाल्या तेव्हा आम्ही सर्व त्यांच्या समवेत एका खोलीत बसलो होतो. बापूंनी पादुकांना स्पर्श केला व ते आमच्याशी बोलत होते. आम्ही कानात प्राण आणून त्यांचे शब्द ऐकत होतो. अचानक लाइट्स् गेले! खोलीत मिट्ट अंधार झाला. काहीही दिसत नव्हतं. बापूंचं हसणं मात्र ऐकू येत होतं. त्यांनी लायटर पेटवला आणि पुन्हा हसून आम्हाला सगळ्यांना आशीर्वाद दिला. जणू ते सांगत होते, बघा! जर तुम्ही माझ्या चरणांपाशी असलात तर तुमच्या अंधाराचं रुपांतर मी प्रकाशात करतो! त्या क्षणापासून पादुकांशी हा प्रसंग घट्ट जुळला आहे. 'ह्या इथे' असणं म्हणजे प्रकाशाच्या प्रदेशात असणं. हाच आमचा विश्वास आहे!

हे शब्द, तो क्षण सर्वांबरोबर अनुभवणं खूप सुंदर असतं आणि आम्ही ते करतो. जो कोणी उपासनेत येतो, अगदी नवीन व्यक्ती का असेना, तो ह्या प्रकाशाच्या प्रदेशातच असतो आणि त्याचं बापूंच्या ह्या प्रदेशात प्रेमानेच स्वागत होतं. ही शनिवारची उपासना म्हणजे वर्षभर पर्वणीच असते.

तीन महिन्यांपूर्वी मला पुन्हा एकदा बापूंच्या प्रेमळ कृपाहस्ताचा अनुभव आला:

आम्ही कुटुंबीय बाहेर जेवायला गेलो असताना मला कसंसंच वाटू लागलं. आम्ही घरी परतलो. रात्रभर इतक्या उलट्या होत होत्या की पूर्ण रात्र बाथरूममध्येच काढली! पोटात असह्य दुखत होतं. विचार करू शकले तो फक्त बापूंचा. दुसऱ्या दिवशीही तेच. फूड-पॉइझनिंग असावं असं वाटलं. डॉक्टर येऊन पोटातल्या वेदनेवर इंजेक्शन देऊन गेले. त्या वेळेला पादुका आमच्या घरी होत्या. तोही दिवस असाच झोपून काढावा लागला. उदी घेतली आणि बापूंकडे प्रार्थना केली. तिसऱ्या दिवशीही तसंच चाललं होतं. पडल्यापडल्या बापूंचा मंत्र म्हणत होते. माझ्या डॉक्टर असलेल्या भावाने हॉस्पिटलमध्ये ॲडमिट हो असं सांगितलं. मला नव्हतं जायचं हॉस्पिटलमध्ये. मी माझ्या स्त्रीरोगतज्ज्ञाकडे गेले. ती म्हणाली तुझं पोट इतकं घट्ट झालंय! हे वेगळंच काहीतरी आहे. अपेन्डिक्स असेल. ताबडतोब कोपऱ्यावरच्या हेल्थ केअर सेंटरवर जा आणि तपासून घे! तडक तिथे गेलो. माझे पती, क्रिस्टियानने माझ्या भावाला फोन केला कारण तो मोठ्या हॉस्पिटलमध्ये काम करतो. माझ्या सभोवती सगळी गडबड गजबज होती, माझ्या तपासण्या, टेस्ट....आणि मी तितकीच शांत होत चालले होते. स्वत:तच डोकावलं तेव्हा जाणवलं की मला फक्त आणि फक्त बापूंवरचा विश्वासच जाणवतो आहे. भीतीचा लवलेशही नव्हता. त्या क्षणापासून फक्त बापूंचा मंत्र म्हणत राहिले. अगदी पूर्णपणे निश्चिंत वाटत होतं. मला खात्री होती, बापू मला ह्यातून तारून नेणारच आहेत. शंका

नाही की भय नाही.

सर्व तपासण्यातून असं ठरलं की 'अक्यूट अपेन्डिसायटिस' आहे. अशावेळी लगेचच ऑपरेशन करावं लागतं. सगळं खूप वेगाने घडलं. माझ्या आठवणीत शेवटचं चित्र म्हणजे थिएटर मधले डॉक्टर. मी पूर्ण विश्वासाने म्हटलं, 'बापू!'. त्यानंतर शुद्ध हरपली.

मागे वळून पाहताना वाटतं, हा प्रसंग पॉझिटिव्हच होता. माझा विश्वास अधिक बळकट झाला.

मला ऑपरेशननंतर जाग आली तेव्हा मला सगळे सांगत होते, 'तुझं लक काय जबरदस्त आहे! वाचलीस तू! अपेन्डिक्स तर केव्हाच बर्स्ट झाला होता'.

मला एक माहीत होतं – 'लक' काय एवढं मोठं! माझ्याकडे बापू आहेत आणि बापू म्हणजेच लक!

शेवटी आणखीन एक असा सुंदर अनुभव सांगते. बापू आपल्याला कसा प्रतिसाद देतात–चित्रातून, प्रतिकातून, रंगातून, स्वरातून किंवा अशा एका भाषेतून, जी पूर्णत: वैयक्तिक असते व प्रत्येकाला एका खास पद्धतीने प्रतीत होते.

डिसेंबर २०१०ची गोष्ट. आम्ही नुकतेच भारताहून परतलो होतो. जर्मनीत खूप थंडी होती. आम्हाला आमचे अनुभव लिहून काढायचे होते. काम सोपं नव्हतं. मला लगेचच आठवले ते कृपासिंधुमध्ये दर महिन्याला येणारे; संकटातून, जीवनमरणाच्या प्रसंगातून, दुर्धर आजारातून बापूकृपेने वाचलेल्या भक्तांचे अनुभवकथन!

मी बापूंच्या पादुकांसमोर बसले आणि म्हटलं, 'बापू, मी काय लिहू?' मला कुठेतरी ह्या लिखाणाचं टेन्शन आलं होतं कारण कृपासिंधुमध्ये वर्णिलेल्या त्या अनुभवांसारखा असा टोकाचा कठीण प्रसंग तर आपल्या आयुष्यात आला नाही. मग....नाही, अशी तुलना योग्य नाही. बापूंनी माझं आयुष्य कसं बदलून टाकलं ते मी लिहीन.

माझ्या 'ऑल्टर' (देवघर) मधल्या मेणबत्त्या तेवत होत्या. खूप थंडी असल्यामुळे मी बिछान्यावर पांघरुण घेऊनच बसले. रामनाम वही लिहिली, कृपासिंधु वाचला. असंख्य विचार चालले होते. बेचैन वाटलं, अगदी आपण काही कामाचेच नाही असंही वाटलं. हे असं चालू असतानाच झोप लागली.

२.३०च्या सुमारास दचकून जाग आली, अगदी घंटीच्या आवाजाने यावी तशी.....आणि लक्षात आलं की सगळ्या मेणबत्त्या अजूनही तेवत होत्या व पादुकांवर मी कव्हर घातलं नव्हतं, रोज घालते तसं. पुढच्या क्षणाला मला पडलेलं स्वप्न आठवलं:

....एक सुंदर त्रिकोणी तंबू आहे....शुभ्र, पांढरा, रेशमी. ही माझ्या घरातली बापूंची विश्रांतीची जागा आहे. बापू येऊन तिथे बसतात, काही वाचतात. ''बापू, थोडी विश्रांती घेणार का?'' असं मी विचारते. ते म्हणतात, ''नंतर''. त्यांचं एक लेकरूही तिथे आहे. एक अगदी लहान मुलगी. तिला भूक लागली आहे. मी घरात पूर्ण शांतता राहील अशी व्यवस्था करते आणि तिच्या जेवणाचं बघावं म्हणून वळते. घरात मला भारतात करतात ती पुरणपोळी मिळते. मी पुन्हा बापूंकडे येते. बापू माझ्यासमोरच आहेत. ते मला भरभरून आशीर्वाद देतात, माझ्यात फक्त प्रेम झिरपत रहातंय अशी जाणीव होते, प्रेमाचा प्रवाह बापूंकडून, ह्या माझ्या बापाकडून अव्याहत वाहतो आहे. त्यांच्या चेहऱ्यावर हे प्रेम इतकं स्पष्ट दिसतंय! बापू हसतात. त्यांना आता विश्राम करायचा आहे. ''थंडी खूपच आहे. पांघरूणं लागतील मला'', बापू म्हणतात. मी ब्लँकेट्स्‌ची व्यवस्था करते. माझ्या देवाला थंडी वाजता कामा नये.

हा माझा देव कधी माझा बाप असतो, तर कधी माझा मुलगा; कधी माझी आई, तर कधी मित्र – असा विचार करत मी जागत बसते, बापूंच्या समोरच. त्यानंतर बापूंचं अस्तित्व माझ्या हृदयात जाणवतं – 'बापूज्‌ लाइव्ह प्रेझेन्स इन माय हार्ट!' अशी जाणीव झाली की मी बापूंपासून वेगळी नव्हतेच!

मग मी उठून मेणबत्त्या विझवल्या, ऑल्टर (देवघर) रात्री असतं, तसं करून ठेवलं. रोज रात्रीप्रमाणे पादुकांवर एक उबदार पांघरूण घातलं. बापू म्हणाले होते ना, ''थंडी खूप आहे'' म्हणून!

मुंबईत आता सकाळचे ७ वाजले असतील. हीच तर बापूंची रोजची रात्रभर काम करून झाल्यावर झोपायची वेळ आहे! तिथेही आत्ताच बापू विश्रांती घ्यायला गेले असतील. मी पुन्हा येऊन बिछान्यावर पडले....अतिशय शांत.

ह्यानंतर रात्री आणखीन एक स्वप्न पडलं:

नंदाई एका लहानशा चौकोनी स्पेसमध्ये उभी आहे. हा चौकोन आकाशाच्या दिशेने उघडा, मोकळा असा आहे. चहुबाजूंनी निसर्ग, वाळू, दाट झाडी, समुद्र, धुकं आहे. ती तिथे प्रत्येक संध्याकाळी उभीच असते. अगदी अनंत काळापासून उभीच आहे असं वाटतं. तिच्याकडे आपण जाऊ शकतो, पण एक अंतर आहे. हे सगळं काही आगळंवेगळं आहे, वेगळ्याच डायमेन्शनमधून आपल्यापर्यंत पोहोचतंय असं वाटतं. इथे प्रामुख्याने हिरव्या रंगाचं अस्तित्व आहे. नंदाईनेदेखील हिरवीच साडी परिधान केली आहे. मी बापूंसोबत आणि नंदाईसोबत तिच्याचकडे येते; 'ह्या आईकडे'. ही सर्वच मग सर्व जगताला त्यांच्या वरदहस्तांनी भरण–पोषणाचा, सुजलाम्‌–सुफलाम्‌ होण्याचा आशीर्वाद देतात.

स्वप्नातून सकाळी जाग आली तेव्हा मी खूप आनंदी, पण भावुक झाले होते. बापूंचं असंच असतं, नाही का? आपल्याशी सतत संपर्क, आपल्या प्रार्थनांना त्वरित प्रतिसाद, प्रश्नांचे त्वरित समाधान आणि तेही प्रत्येकासाठी जे, जसं आवश्यक आहे तेच आणि तसंच!

बापू माझ्या आयुष्यात आले, त्याबद्दल मी त्यांची खूप ऋणी आहे. मला सदासर्वकाळ त्यांनी आपल्या चरणांशी राहू द्यावं ही त्यांच्या चरणी एकच प्रार्थना. हरि ॐ.